जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ०७ दिनांक - ०५/०१/२०२५**

गुन्हे शाखा,खंडणी विरोधी पथक - २, पुणे शहर

## अत्याचार करून खंडणी मागणा-या गुन्ह्यातील आरोपीस केले जेरबंद

खंडणी विरोधी पथक २, गुन्हे शाखाचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.विजय कुंभार, यांचे देखरेखीखाली पथक माहिती काढीत असताना **पोलीस अंमलदार सुरेंद्र जगदाळे व अनिल कुसाळकर** यांना मिळालेल्या गोपनीय बातमीचे आधारे भारती विद्यापीठ पोलीस पोलीस स्टेशन गुन्हा रजि. ०६/२०२४ बीएनस कलम ६४,६४(२)(एम),३०८(३),३५६(२),३५२ ३५१(२) माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(सी) या गुन्ह्यातील पाहिजे आरोपी मानस उर्फ शुभांशु उपेंद्र शर्मा, वय-२४, रा. अप्पर इंदिरा नगर, बसडेपो जवळ, बिबवेवाडी, पुणे हा नया बाजार, ५ नं. गेट जवळ, मार्केटयार्ड येथे थांबला असल्याची बातमी मिळाली.

सदरची बातमी वरिष्ठांना सांगुन स्टाफसह मार्केटयार्ड गेट नं.५ जवळ येथे नमुद इसमाचा शोध घेतला असता, सदरचा इसम पळुन जाण्याच्या तयारीत असताना लागलीच त्यास स्टाफचे मदतीने पकडून, नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव **मानस उर्फ शुभांशु उपेंद्र शर्मा, वय-२४, रा. अप्पर इंदिरा नगर, बसडेपो जवळ, बिबवेवाडी, पुणे मुळ गांव- करुआ गाव, तहसील सुहागपुर, जि. शॅडोल, राज्य मध्यप्रदेश** असे सांगितले. नमुद इसम याचेकडे दाखल गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस केली असता, त्याने सदरचा गुन्हा केला असल्याचे सांगीतल्याने त्यास ताब्यात घेवुन गुन्ह्याचे पुढील कारवाई कामी पारगाव पोलीस स्टेशन पुणे ग्रामिण यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री. अमितेश कुमार, मा. सह पोलीस आयुक्त,पुणे श्री. रंजनकुमार शर्मा, मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री.शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे,श्री. निखील पिंगळे,सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे २ श्री.राजेंद्र मुळीक यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथक २, गुन्हे शाखाचे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय कुंभार व पोलीस अंमलदार सुरेंद्र जगदाळे, कुसाळकर, दिलीप गोरे, राऊत यांनी केली.